प्रेरणा
को – ऑप. बँक लिमिटेड
PRERANA
CO-OP. BANK LTD.
मुख्य कार्यालय : लक्ष्मणनगर, थेरगांव, पुणे – ४११ ०३३. ☎ 9075028001/2 www.preranabank.com

# सेफ डिपॉझिट लॉकर्स संबंधीचे नियम

१. लॉकर साठी मागणी करणारा खातेदार अथवा संयुक्त खातेदार हा बँकेच्या कार्यक्षेत्रात वास्तव्य व व्यवसाय किंवा नोकरी करणारा पाहिजे. लॉकर भाड्याने घेण्यासाठी खातेदार बँकेचा नियमित सभासद/नाममात्र सभासद असणे आवश्यक राहील तसेच KYC ची पूर्तता करून बँकेचा बचत /करंट खातेदार असणे आवश्यक राहील.

२. लॉकरसाठी मागणी करणाऱ्या खातेदारास अथवा संयुक्त खातेदारास बँकेच्या विहित नमुन्यातील अर्जाद्वारे मागणी करावी लागेल, त्याने शाखास्तरावर अर्ज सादर करताना लॉकर उपलब्ध नसल्यास त्यावर प्रतिक्षा यादीचा क्रमांक नोंदविण्यात येईल व अर्ज दाखल झालेबाबत पोहोच दिली जाईल.

३. लॉकर निरनिराळ्या आकाराचे असतात त्याचे आकारानुसार खातेदार व संयुक्त खातेदार यांचेकडून रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार मुदत ठेव (सुरक्षा ठेव) स्वीकारली जाऊन ती तारण म्हणून डिसचार्ज करुन बँक दफ्तरी ठेवण्यात येईल.

४. लॉकर भाडे धारकाने लॉकरचे भाडे व सुरक्षा ठेव आगाऊ भरली पाहिजे. लॉकरचे आकारानुसार लॉकरचे भाडे ठरविण्याचा अगर ते कमी जास्त करण्याचा किंवा ठराविक मर्यादेनंतर पुढील प्रत्येक लॉकर ऑपरेशनसाठी चॉर्जेस लावण्याचा/न लावण्याचा अधिकार बँक व्यवस्थापनाचा राहील व तो वेळोवेळी आढावा घेऊन ठरवण्यात येईल.

५. लॉकर भाडे धारकाला त्याचा लॉकर कोणास ही पोट भाड्याने देता येणार नाही.

६. बँकेच्या शाखांतून लॉकर अदा करताना बँक व खातेदार किंवा संयुक्त खातेदार यांच्यामध्ये लॉकरचे संदर्भात व्यवहार करणेचा करारनामा करणेत येईल व त्याची एक प्रत खातेदाराला दिली जाईल.

७. लॉकरमध्ये स्फोटक व आरोग्य विघातक किंवा कोणत्याही प्रकारे धोका निर्माण करणारे जिन्नस तसेच कायद्याने प्रतिबंधित वस्तू ठेवता येणार नाहीत. असे जिन्नस लॉकरमध्ये ठेवल्याचे किंवा ठेवण्याचा हेतू असल्याचे बँकेचे निदर्शनास आल्यास बँक लॉकर भाड्याने देण्यास नकार देईल किंवा अगोदर लॉकर भाड्याने दिला असेल तर तो तातडीने मोकळा करुन घेण्यात घेईल.

८. भाड्याने दिलेला प्रत्येक लॉकरचा नंबर, किल्लीचा नंबर व भाडेकऱ्याने दिलेला सांकेतिक शब्द हे गुप्त ठेवण्यात येतील. भाडेकऱ्याकडून यापैकी कोणत्याही गोपनीय गोष्टीचा भंग झाल्यास व त्यामुळे भाडेकऱ्याचे नुकसान झाल्यास त्याचे उत्तरदायित्व बँकेवर राहणार नाही.

९. लॉकर भाडेकऱ्याला दिलेली किल्ली त्याचेकडून गहाळ झाल्यास, हरविल्यास अगर दुसऱ्या कोणाचे हाती पडल्यास त्यामुळे उद्‌भवणाऱ्या परिणामांचे, नुकसानीचे अगर खर्चाचे उत्तरदायित्व भाडेकऱ्यावरच राहील. लॉकरची किल्ली हरविल्यास, अगर गहाळ झाल्यास भाडेकऱ्याने ताबडतोब बँकेस तसे लेखी कळविले पाहिजे. किल्ली गहाळ झाल्यास लॉकरची चावी व लॉक बदलण्यासाठी कंपनीकडून होणारा अपेक्षित सर्व खर्च भाडेकऱ्यास अदा करावा लागेल.

१०. लॉकर भाडेकऱ्याच्या कोणत्याही कृत्यामुळे लॉकर्सचे अगर लॉकर असलेल्या इमारतीचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई भाडेकऱ्याकडून वसुल केली जाईल.

११. बँक लॉकर सुरक्षततेची योग्य ती काळजी घेईल परंतु भाडेकऱ्याच्या निष्काळजीपणामुळे किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे लॉकरमधील वस्तूंचे नुकसान झाल्यास बँक जबाबदार राहणार नाही. चोरी, दरोडा, आग, फ्रॉडमुळे होणाऱ्या नुकसानी बाबत बँक वार्षिक लॉकर भाड्याच्या जास्तीत जास्त १०० पट पर्यंतच नुकसान भरपाईस जबाबदार राहील.

१२. लॉकर भाडे धारकाचा लॉकर फोर्सफुली उघडतेवेळी व त्यातील मौल्यवान जिनसा ताब्यात घेताना, बँकेच्या रिझर्व्ह बँकेने निर्देशित केलेल्या व बँकेच्या पॉलिसीनुसार कार्यवाही करेल.

१३. लॉकर धारकाच्या मृत्यूनंतर रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडील वेळोवेळीच्या परिपत्रक आदेशा नुसार तसेच बँकेच्या धोरणानुसार बँक व्यवस्थापन निर्णय घेऊन लॉकर भाडे धारकाच्या लॉकर्समधील जिनसा सर्व्हायव्हर/वारसदार/कायदेशीर अधिकृत वारसदार यांना अदा करेल. लॉकर धारकाने वर्षातून किमान एकवेळी लॉकर ऑपरेट करणे आवश्यक आहे. लॉकर सलग ७ वर्षे ऑपरेट केला गेला नाही तर जरी भाडे भरले असेल तरी बँक लॉकर सरेंडर करण्यासाठी लॉकर धारका विरूध्द कारवाई करू शकेल.

१४. लॉकर भाडे धारकाने लॉकरला वारसदार म्हणून नोंद केल्यास त्याच्या मृत्युनंतर त्याने नियुक्त केलेल्या व्यक्तीला लॉकरमधील वस्तू बँकेच्या प्रोसीजर प्रमाणे देईल. ज्यावेळी अज्ञानाचे नावाने लॉकर असेल तेव्हा अज्ञानाच्या वतीने व्यवहार करण्याचा कायदेशीर अधिकार असलेल्या व्यक्तीस या वस्तू देण्यात येतील.

१५. लॉकर धारण करताना एकापेक्षा जास्त व्यक्तीने तो घेतला असेल व त्यापोटी तारण म्हणून बँकेकडे मुदत ठेव ठेवली असेल तर त्यावेळी एकापेक्षा जास्त वारसदारांची नोंद लॉकर व मुदत ठेवी साठी करता येणार नाही.

१६. लॉकर भाडे धारकाच्या वारस नोंदीसाठी बँक विहित अनेक्चर–१ या नमुन्यातील फॉर्म सेक्शन ४५ ZC (३) व (४) लॉकर भाडे धारकांकडून भरुन घेईल व तो भरुन देणे बाबत त्यांच्यावर बंधनकारक राहील.

१७. जर वारसदार/सर्व्हायव्हर/कायदेशीर अधिकृत वारसदार जर लॉकर्स सुविधा पुर्ववत सुरु ठेवणार असतील तर अशावेळी बँक त्यांचेशी नवीन करारनामा करुन घेईल व बँकेच्या धोरणानुसार लॉकर अदा करेल.

१८. भाडेकऱ्याने लॉकर वापरताना वेळी अन्य लॉकर्सच्या भाडेकरुंना विलंब होईल अशा प्रकारचे वर्तन करु नये. तसेच लॉकर धारकाच्या वर्तनामुळे बँकेच्या अन्य खातेदारांना त्रास/अडथळा निर्माण होत असल्यास (लॉकर धारकाकडून लॉकर सरंडर करून घेण्याचा व तशी कारवाई करण्याचा अधिकार बँकेस राहील.)

१९. भाडेकऱ्याने लॉकर उघडून बाहेत जाताना त्याने आपला लॉकर बंद करुन घेतला आहे किंवा नाही याची खात्री करुन घ्यावी स्वत: भाडेकऱ्यांचे हातून लॉकर उघडा राहिल्यास त्याचे होणाऱ्या नुकसानास बँक जबाबदार राहणार नाही.

२०. लॉकर भाडे धारकांशिवाय अन्य इसमांस लॉकर विभागात प्रवेश नाकारण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवला आहे.

२१. बँकेकडे नमुद असलेल्या पत्यावर लेखी नोटीस पोस्टाने अगर अन्य मार्गाने पाठविली असता ती भाडेकऱ्यावर अगर त्याचे अधिकृत वाली वारसावर योग्यप्रकारे लागू झाली असे समजण्यात येईल.

२२. बँक व लॉकर्स भाड्याने घेणारा यांचे संबंध बँक व खातेदार असे न राहता मालक व भाडेकरी असे राहतील.

२३. नियमांविरुध्द वर्तन करणाऱ्या भाडेकऱ्याचा लॉकर वापरण्याचा हक्क रद्द करण्याचा व लॉकर धारकाकडून लॉकर सरेंडर करून घेण्याचा कायदेशीर अधिकार बँकेकडे राहील.

२४. लॉकर भाडे धारकाच्या लॉकरमधील जिन्नसाच्या जोखमीचा विमा बँक करणार नाही.

२५. लॉकर भाडे धारकाला त्याचे स्वत:चे नावावरील लॉकरवर व्यवहार करणेसाठी प्रतिनिधी नेमताना, त्याचे KYC डिटेल्स व नमुन्याची सही बँकेस द्यावी लागेल. नेमून दिलेल्या मुखत्यार काढून टाकावयाचा झाल्यास किंवा त्याऐवजी दुसरा नेमावयाचे झाल्यास लॉकर धारकाला बँकेला तशा बदलाची नोटीस देणे बंधनकारक राहील तसेच मुखत्याराने जे व्यवहार लॉकर धारकासाठी केले आहेत त्याची सर्वस्वी जबाबदारी ही लॉकर धारकावर राहील बँकेवर राहणार नाही.

२६. लॉकर भाडेधारक अंगठ्याचा ठसा देत असेल तर त्याला दोन व्यक्तींची साक्ष द्यावी लागेल.

२७. सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर भाड्याने देणेबाबत बँकेने जे नियम केले आहेत ते लॉकर भाडे धारकावर बंधनकारक असून त्याबाबत लॉकर भाड्याने मिळणेसाठीच्या अर्जाद्वारे त्यांनी त्यास मान्यता दिली असे समजणेत येईल तसेच बँकेचे सर्व नियम व करारनाम्यातील अटी जशा त्याच्यावर बंधनकारक आहेत त्या त्याच्या पश्चात, त्याच्या निधनानंतर त्याचे वारसदार, एक्झिक्युटर, ॲडमिनिस्ट्रेटर, असाईनीजवर ही बंधनकारक राहतील.

२८. लॉकर भाडे करारानुसार करारनाम्याची मुदत संपले नंतर लॉकर धारकाने तो बँकेचा लॉकर पुढील कालावधीसाठी सुध्दा भाड्याने ठेवावयाचा असल्यास त्या कालावधीचे भाडे भरावे लागेल अन्यथा तो लॉकर बँकेस मोकळा करुन दिला पाहिजे व ते त्याच्यावर बंधनकारक राहील.

२९. वरील नियमांमध्ये वेळोवेळी आवश्यक ते बदल/दुरुस्ती करण्याचे अधिकार बँकेस राहतील असे होणारे बदल बँकेच्या सुचना फलकावर लावण्यात येतील व ते लॉकर भाडे धारकावर बंधनकारक राहतील.

३०. संयुक्त लॉकर धारकापैकी एकाचा /अनेकांचा मृत्यू झाल्यास नॉमिनेशन न केलेल्या लॉकर धारकाचा मृत्यू झाल्यास लॉकर धारकाशी संपर्क होऊ शकत नसल्यास, लॉकर धारकाने ३ वर्षापेक्षा अधिक कालावधीचे भाडे थकविले असल्यास तसेच सरकारी किंवा कोर्ट ऑर्डरमुळे लॉकर सील केल्यास लॉकर मधील वस्तू संबंधीची पुढील कारवाई व कार्यवाही बँकेच्या पॉलीसीप्रमाणे केली जाईल त्यास लॉकर धारकाची मान्यता व त्याच्या नॉमिनीची मान्यता असेल.

# सेफ डिपॉझिट लॉकर भाड्याने मिळण्यासाठी अर्ज

शाखा व्यवस्थापक दिनांक :

प्रेरणा को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड.

शाखा : ____________________

मला/आम्हाला आपल्या बँकेच्या सेफ डिपॉझिट व्हॉल्टमध्ये ________________ वर्गाची एक सेफ (लॉकर) नंबर ________________ ची तारीख ________________ पासुन पुढे ________________ महिने मुदतीने वापरण्याकरिता भाड्याने मिळावी अशी विनंती आहे. सदर सेफचे जे भाडे व सिक्युरिटी डिपॉझिट असेल ते मी/आम्ही नियमाप्रमाणे आगाऊ भरण्यास तयार आहे/आहोत. सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर भाड्याने देण्याबाबत बँकेचे जे नियम केले आहेत ते मी/आम्ही वाचले असून ते मला/आम्हाला मान्य आहेत आणि सदर नियम व त्यात संचालक मंडळ वेळोवेळी ज्या दुरुस्त्या करील आणि किंवा भाडे वाढवील ते सर्व मजवर/आम्हावर बंधनकारक असून त्याप्रमाणे वागण्याचे मी/आम्ही कबूल करतो. माझे/आमचे पश्चात माझ्या/आमचे अधिकृत इसमावर व असाईनी एक्झिक्युटर व ॲडमिनिस्ट्रेटर व हक्कधारक आणि वालीवारस वगैरेवर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे त्यांनी वागले पाहिजे व वागतील. वरीन मुदत संपल्यावर पुढेसुध्दा लॉकर सुविधा चालू ठेवावयाची असल्यास मी/आम्ही प्रत्येक वेळी बँकेने ठरविलेले भाडे अदा केल्यानंतर आहे त्याच अटी/शर्तीवर लॉकर कराराची मुदत वाढविण्याची विनंती आहे.

आम्हाला मिळणाऱ्या लॉकर मधील व्यवहार वरील पैकी

१) कोणीही एक स्वतंत्रपणे करू शकेल. ☐ २) सर्वजण संयुक्तपणे करू शकतील. ☐

वरील लॉकरधारकापैकी कोणाचाही मृत्यू झाल्यास अन्य लॉकर धारकास लॉकर मधील व्यवहार करण्याचे अधिकार राहतील.

| | अर्जदाराची सही | |
|---|---|---|
| अर्जदाराचे नाव १) ____________ | | फोटो |
| पत्ता ____________ | | |
| फोन नंबर ____________ | ____________ | |
| अर्जदाराचे नाव २) ____________ | | फोटो |
| पत्ता ____________ | | |
| फोन नंबर ____________ | ____________ | |
| अर्जदाराचे नाव ३) ____________ | | फोटो |
| पत्ता ____________ | | |
| फोन नंबर ____________ | ____________ | |

## प्रेरणा को- ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

(फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता)

श्री/श्रीमती ________________________ यांना त्यांचे अर्जाप्रमाणे

________________________________________

वर्गाची लॉकर नं. ____________ तारीख ____________ पासून पुढे ____________ महिने ______ मुदतीने भाड्याने द्यावी व त्यांचे कडून आगाऊ रोख भाडे रुपये ________________ घेऊन व ठरविलेल्या नमुन्यात भाडे करारनामा लिहून घेऊन लॉकरची किल्ली त्यांच्या ताब्यात द्यावी व त्यांना सदर लॉकरचा उपयोग करु द्यावा.

दिनांक : शाखा व्यवस्थापक

प्रेरणा
को – ऑप. बँक लिमिटेड
PRERANA
CO-OP. BANK LTD.
मुख्य कार्यालय : लक्ष्मणनगर, थेरगांव, पुणे – ४११ ०३३. ☎ 9075028001/2 www.preranabank.com

शाखा :

# इंडेक्स कार्ड

## सेफ डिपॉझिट लॉकर बाबत

१) संपूर्ण नाव श्री/श्रीमती ______________________

पत्ता ______________________

२) संपूर्ण नाव श्री/श्रीमती ______________________

पत्ता ______________________

३) संपूर्ण नाव श्री/श्रीमती ______________________

पत्ता ______________________

४) लॉकरचा प्रकार __________ किल्ली नंबर __________ लॉकर नंबर __________

५) सांकेतिक शब्द असल्यास ______________________

६) प्रतिनिधीचे नाव (नेमणार असल्यास) ______________________

७) प्रतिनिधीचा पत्ता ______________________

८) मृत्युनंतर सेफ कोणी उघडावी ______________________

त्यांचे नाव व पत्ता (नॉमीनी) ______________________

______________________

९) लॉकर धारकाची नमुन्याची सही [ ]

१०) प्रतिनिधीची नमुन्याची सही [ ]

# प्रेरणा को- ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

(पावती)

प्रेरणा को–ऑपरेटिव्ह बँक लि. ______________________

च्या सेफ डिपॉझिट व्हॉल्ट मधील वर्गाची लॉकर नंबर मी/आम्ही सदर बँकेकडून तिने केलेल्या नियमास पात्र राहून भाड्याने घेतली असून सदर लॉकर वापरण्याकरिता घेतली आहे व तिची किल्ली मला/आम्हाला आज रोजी सदर बँकेकडून मिळली असल्याने मी/आम्ही ही पावती सदर बँकेस लिहून देत आहे/आहोत.

१) २) ३)

दिनांक : लॉकर धारकाची सही

प्रेरणा
को – ऑप. बँक लिमिटेड
PRERANA
CO-OP. BANK LTD.
मुख्य कार्यालय : लक्ष्मणनगर, थेरगांव, पुणे – ४११ ०३३. 9075028001/2 www.preranabank.com

(प्रचलित रकमेच्या स्टॅम्प पेपर वर)

# सेफ डिपॉझिट लॉकरबाबत भाडे – करारनामा

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, **प्रेरणा को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड.** तर्फे

श्री./श्रीमती ______________________________ करारनामा लिहून घेणार

शाखा व्यवस्थापक/अधिकृत प्रतिनिधी ______________________________ शाखा

१) श्री./श्रीमती ______________________________ करारनामा लिहून देणार

______________________________

वय वर्ष : __________ व्यवसाय : ______________________________

राहणार : ______________________________

२) श्री./श्रीमती ______________________________ करारनामा लिहून देणार

______________________________

वय वर्ष : __________ व्यवसाय : ______________________________

राहणार: ______________________________

३) श्री./श्रीमती ______________________________ करारनामा लिहून देणार

______________________________

वय वर्ष : __________ व्यवसाय : ______________________________

राहणार: ______________________________

आज रोजी आपल्या बँकेच्या लॉकर डिपॉझिट व्हॉल्टमधील एक लॉकर आमचे जिन्नस ठेवण्याकरिता भाड्याने वापरण्यास मिळावा म्हणून आम्ही विनंती अर्ज केला तो आपण मान्य करुन आम्हास __________ वर्गाची लॉकर नंबर __________ भाड्याने वापरण्यास देण्याचे कबूल केल्यावरुन आम्ही आपणास भाडे करारनामा लिहून देत आहोत तो असा की,

१) आपले बँकेतील लॉकर डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर भाड्याने देण्याबाबतचे जे नियम आज अस्तित्वात आहेत ते सर्व आम्ही वाचले व ते आम्हास मान्य आहेत. यापुढे वेळोवेळी बँकेचे संचालक मंडळ जे नियम करील अगर त्यांत दुरुस्त्या करतील ते नियम व दुरुस्त्या आमच्यावर बंधनकारक राहतील. या करारनाम्यात अशा कोणत्याही चालू व पुढे होणाऱ्या नियमांचा व दुरुस्त्यांचा उल्लेख केला नसला व करता येत नसला तरी आम्ही वर मान्यता दर्शविली व बंधन पत्करले व त्यामुळे त्यास बाधा येत नाही व त्याचप्रमाणे आम्ही वागू.

२) सदर करारनाम्याचे पोटी आज रोजी आम्ही आपणास भाडे रु. __________ व सिक्युरिटी डिपॉझीट रू. __________ अगाऊ द्यावयाचे ते दिले आहे.

३) करारनाम्याची मुदत आजपासून __________ महिने आहे. ह्या मुदतीत आम्ही बँकेची लॉकर मोकळा करुन देऊ. मुदती नंतर सुध्दा लॉकर वापरण्याकरिता आमचेकडे ठेवण्याचा असल्यास व आपण लॉकर दिल्यास या करारनाम्याची मूळ मुदत संपण्यापूर्वी त्या वेळी प्रचलित असलेल्या बँकेच्या नियमाप्रमाणे आगाऊ भाडे देऊ. या प्रमाणे आम्ही न वागल्यास नियमाप्रमाणे आमचेवर पडणाऱ्या जबाबदारीस आम्ही पात्र असू.

४) भाडे कराराची मूळ मुदत संपण्यापूर्वी अगर उभय पक्षांनी वाढवलेली मुदत संपण्यापूर्वी आम्ही मयत झाल्यास आमचे अधिकार ज्या कोणास द्यावयाचे ते त्यांचे नॉमीनेशन आम्ही निराळे केलेल आहे व आपल्याकडे दिलेले आहे.

५) आम्ही ठरविलेला सांकेतिक शब्द आपणास कळविला आहे. सदर सांकेतिक शब्द आमचे गौप्य म्हणून पाळून कदाचित आमचे हातून त्यात काही चूक झाल्यास जे नुकसान होईल त्याची सर्व जबाबदारी आमचेवर आहे.

६) लॉकरच्या अंगच्या कुलूपाच्या प्रत्येकी एक अशा दोन किल्ल्या आहेत. त्यापैकी एक किल्ली (मास्टर किल्ली) आपले जवळ असून दुसरी आपण आम्हास दिली ती आम्ही जतन करु व हरविल्यास ताबडतोब कळवू. किल्ली आमचेकडून हरविल्याने किंवा आमच्या दुसऱ्या कोणत्याही कृत्याने बँकेच्या इमारतीचे, सेफचे वगैरे अगर दुसऱ्या कोणाचेही नुकसान झाल्यास ते आम्ही बिनतक्रार भरुन देऊ.

७) कारणपरत्वे आम्हांस स्वत: येऊन लॉकर उघडणे शक्य न झाले तर अशा वेळी लॉकर उघडण्याचा अधिकार आमच्यातर्फे ज्या कोणा इसमास दिला/द्यावयाचा असेल त्याचे नाव त्याचे सहीचा नमुना आम्ही स्वत: बँकेत दाखल करीत आहोत/करु. एकदा दिलेला मुखत्यार काढून टाकावयाचा झाल्यास किंवा त्याचे ऐवजी दुसरा मुखत्यार नेमावयाच झाल्यास तशी लेखी नोटीस आम्ही बँकेस आगाऊ देऊ. तत्पुर्वी बँकेचा दप्तरी दाखल असलेल्या मुखत्याराने जे व्यवहार आमच्याकरिता केले असतील त्याची जबाबदारी आमच्यावरच आहे, बँकेवर नाही. एक मुखत्यार कमी करुन दुसरा मुखत्यार नेमते वेळी जरुर वाटल्यास आम्ही आपला खुणेचा शब्द बदलून घेऊ व तसा तो आम्हास बँकेने बदलून द्यावा. आम्ही दिलेल्या मुखत्याराच्या कोणत्याही कृत्याची जबाबदारी बँकेचा भाडेकरी या नात्याने सर्वस्वी आमच्यावर आहे व आमचेकडून बँकेचे जे नुकसान होईल, ते आम्ही बँकेस भरुन देऊ.

८) आज रोजी सेफ डिपॉझिट लॉकर वर्ग ______________ नंबर ______________ चा लॉकर वापरण्याकरिता प्रत्यक्ष रितीने आम्हांस या करारनाम्यान्वये आपण दिला व आम्ही घेतली आहे.

९) आमच्या कोणत्याही कृत्यामुळे बँकेचे जे नुकसान होईल त्याचा बोजा लॉकरमध्ये असलेल्या जिन्नसावर असल्याचे आम्हास कबूल आहे. आम्ही अगर आमच्या अधिकृत इसमांनी अगर वालीवारस वगैरेंनी बँकेचे आमच्याकडे जे लॉकर डिपॉझिट व्हॉल्टबाबत येणे होईल ते न दिले तर सदरचे जिन्नस बँकेचे नियमाप्रमाणे विकून वसूल करुन घ्यावे व कमी आल्यास ते पुरे करण्यास आम्ही जातीने बांधून घेत आहोत. आमच्या पश्यात आमची इस्टेट सदर देण्यास जबाबदार राहील. बँकेला देय होणारी सर्व रक्कम आमचे इस्टेटीमधून वसूल करुन घेण्याचा बँकेस अधिकार राहील.

१०) हा करारनामा व सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर भाड्याने देण्याबाबतचे बँकेचे सर्व नियम व या दोन्हीमुळे उत्पन्न होणारे आपणा उभयतांचे अंतर्गत परस्पर संबंध व आमच्यावर येत असलेल्या जबाबदाऱ्या व बंधने यास आम्ही जिम्मेदार आहोत व आमच्या पश्यात आमचे वेळोवेळी नेमून दिलेले अधिकृत इसम, वालीवारस, एक्झिक्यूटर ॲडमिनिस्ट्रेटर, असाईनीज वगैरे सर्व त्यास आमच्याप्रमाणे जिम्मेदार आहेत.

११) आम्हास वापरण्यासाठी दिलेला लॉकर मी किंवा माझ्या/आम्ही किंवा आमच्या अधिकृत प्रतिनिधीने उघडल्यानंतर व्यवस्थित बंद न केल्यामुळे आतील जिन्नसांचे काही नुकसान झाल्यास मी/आम्ही बँकेस जबाबदार धरणार नाही. त्याची संपूर्ण जबाबदारी माझेवर/आमचेवर राहील.

१२) सेफ डिपॉझिट लॉकर्स अथवा लॉकर कस्टडीमध्ये बँकेकडे जिन्नस ठेवल्यावर बँक व लॉकर्स भाड्याने घेणारा अथवा जिन्नस सेफ कस्टडी मध्ये ठेवणारा यांचेमध्ये सदर जिन्नसांबाबत निक्षेपगृहिता (Bailee) आणि निक्षेपदारता (Bailor) असे बंधन राहतील. असे जिन्नस कोव्हाही परत नेण्याबद्दल निक्षेपगृहिता (Bailee) या नात्याने निक्षेपदाता (Bailor) यास लेखी सूचना देण्याचा बँकेस अधिकार राहील. तथापि त्याप्रमाणे जिन्नस परत न नेल्यास त्या जिन्नसांबाबतची बँकेची सर्व जबाबदारी संपुष्टात येईल.

बँकेचे दप्तरी असलेल्या भाडेकरुंचे/निक्षेपदात्याचे सरते शेवटचे पत्त्यावर अशी लेखी सूचना दिल्यावर अथवा लॉकर भाडे थकल्यावर किंवा लॉकर भाड्याने देण्याच्या विशिष्ट मुदतीसाठी केलेल्या कराराची मुदत संपल्यावर निक्षेपदात्याने आवश्यक ती पूर्तता न केल्यास बँकेचे ताब्यात असलेले भाडेकरुंचे/निक्षेपदात्याचे जिन्नस त्यास पूर्वसूचना देऊन त्याची सार्वजनिक लिलावाने वा अन्य मार्गाने विक्री करण्याचा अधिकार बँकेस राहील. विक्री करुन आलेल्या रकमेवर बँकेचा प्रथम हक्क राहील व बँक त्यामधून आपले चार्जेस वसूल करुन घेऊन उर्वरीत रक्कम त्यास अदा करेल.

येणे प्रमाणे हा भाडे करारनामा आम्ही आपल्या राजीखुशीने अक्कल हुशारीने लिहून दिला असून त्यावर आज रोजी आम्ही आपली सही केली आहे व आपणही आपली सही केली आहे.

लॉकर धारकाची सही

**प्रेरणा को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड.** करिता

दिनांक : 

लिहून घेणाराची सही

# सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर व्यवहारासंबंधी अधिकार पत्र

शाखा व्यवस्थापक　　　　　　　　　　　　　　　　　　दिनांक :

**प्रेरणा को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

शाखा : ____________________

मी /आम्ही आपल्या बँकेतील सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील ______________________________ वर्गाची लॉकर क्रमांक ____________ ची _________ महिने मुदतीने दिनांक ____________________ रोजी भाड्याने घेतली आहे.

मी/आम्ही या लेखान्वये सदर लॉकर उघडणे, बंद करणे व तत्संबंधी सर्व प्रकारचे व्यवहार करण्याबद्दलचा अधिकार श्री/श्रीमती ________________________________________________

राहणार ________________________________________________

यांस देत आहे/आहोत. त्यांस जरुर पडेल त्यावेळी त्यांनी आपले बँकेतील वरील लॉकर उघडून चीज वस्तू नेण्यास अगर आणून ठेवल्यास सदरील सर्व व्यवहार मी/आम्ही स्वत:च केल्यासारखा असून तो मजवर/आम्हावर बंधनकारक राहील.

मी/आम्ही अधिकृत केलेल्या इसमाच्या वर्तनामुळे माझे/आमचे काही नुकसान झाल्यास त्याबद्दल मी/आम्ही बँकेस कोणत्याही प्रकारे जबाबदार धरणार नाही व तोषीस लागू देणार नाही.

मी/आम्ही आमचे अधिकृत इसमास सांकेतिक शब्द कळविला असून तो त्यास आपणास बरोबर सांगता न आल्यास अगर आपणास योग्य दिसेल अशा इतर अन्य कारणामुळे आपणास वाटले तर आपण त्यास मनाई करावी. परंतु मनाई करण्याची आपणावर जबाबदारी नाही व मनाई केल्यामुळेही आपणावर कोणत्याही प्रकारची जबाबदारी येणार नाही.

मी/आम्ही आमचे अधिकृत इसमास लॉकर चालविण्याविषयी दिलेले हे अधिकारपत्र रद्द करावयाचे झाल्यास तशा प्रकारचे माझे/आमचे लेखी पत्राने कळवून त्यासंबंधीचे आपणाकडून लेखी येई पावेतो अगर सदरहू लॉकर माझे/आमचेकडे भाड्याने आहे तो पावतो सदरील अधिकारपत्र पूर्णपणे अंमलात राहील.

ज्यास अधिकार दिला आहे त्याच्या सह्यांचे नमुने खालील दिल्याप्रमाणे आहेत.

| ज्यास अधिकार दिला त्याच्या सहीचा नमुना | लॉकर धारकाची सही |
|---|---|
| | |

| प्रतिनिधीचे संपूर्ण नाव | लॉकर धारकाचे संपूर्ण नाव |
|---|---|
| ____________________ | ____________________ |

प्रेरणा को – ऑप. बँक लिमिटेड

PRERANA CO-OP. BANK LTD.

मुख्य कार्यालय : लक्ष्मणनगर, थेरगांव, पुणे – ४११ ०३३. ☎ 9075028001/2 www.preranabank.com

# लॉकर सेवा बंद करण्याचा अर्ज

शाखा व्यवस्थापक　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　दिनांक :

**प्रेरणा को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

शाखा : ________________ यांसी,

मी /आम्ही आपल्या बँकेतील लॉकर डिपॉझिट व्हॉल्टमधील 　　　　　　　 वर्गाची लॉकर क्रमांक हा भाड्याने घेतला असून त्याची मुदत दिनांक 　 / 　 / 　 रोजी संपत/संपली आहे.

यापुढे मला/आम्हाला लॉकर भाड्याने ठेवावयाची नसल्यामुळे ती मधील माझी/आमची सर्व चीजवस्तू मी/आम्ही आज रोजी काढून घेतली असून तो आता पूर्णपणे मोकळा करुन माझे/आमचे जवळील व बँकेच्या किल्लीसह आपल्या ताब्यात दिली आहे. मी/आम्ही त्यामधील माझे/आमचे सर्व जिन्नस काढून घेतले असून त्याबाबत माझी/आमची काही एक तक्रार राहिलेली नाही.

आपला,

लॉकर धारकाची सही

---

## पोच पावती

दिनांक :

प्रेरणा को-ऑपरेटिव्ह बँक लि. ______________________ शाखेची लॉकर डिपॉझिट व्हॉल्टमधील वर्गाचा लॉकर नंबर श्री. ______________________ ______________________ यांनी रिकामी करुन दिली असून त्यांनी तिची किल्ली बँकेस आज दिनांक 　 / 　 / 　 रोजी परत दिली आहे. आता सदर इसमाकडे या लॉकरबाबत बँकेचे काहीही येणे राहिलेले नाही.

प्राधिकृत अधिकारी